www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 329  शुक्रवार दि. 14 ऑगस्ट २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : 6  RNI MAHMAR/2023/89514

## पनवेल महानगरपालिकेच्या वसुलीविरोधात मविआचा पोलखोल धडक मोर्चा



**दैनिक युवक आधार**
**पनवेल / विशाल सावंत**

पनवेल महानगरपालिकेच्या अन्यायकारक, अवास्तव व जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या "मालमत्ता कर" वसुलीविरोधात शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.), शिवसेना (उबाठा), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, महाविकास आघाडीचे घटक पक्ष, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, सामाजिक संघटना व विविध फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी दिनांक १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथून पनवेल महानगरपालिका कार्यालयावर पोलखोल धडक मोर्चा काढण्यात आला. पनवेल महानगरपालिकेने नुकतीच शास्ती माफी जाहीर केल्याने पनवेलमध्ये देवा भाऊ आणि एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य सरकारचे आभार मानणारे बॅनर लावण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात शास्ती माफीचे गाजर दाखवून मालमत्ता करावर व्याज लावून अधिकचे पैसे पनवेलकर नागरिकांकडून लुबाडले जात असल्याचा आरोप करीत पहिल्या ५ वर्षाचा मालमत्ता कर माफ करण्यात यावा, तसेच ठाणे, नवीमुंबई आणि मुंबईप्रमाणे गावठाणातील दराप्रमाणे मालमत्ता कर आकारण्यात यावा, या मागणीसाठी पनवेल महानगरपालिकेवर हा पोलखोल धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात आमदार बाळाराम पाटील, कांग्रेस पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम पाठील , शिवसेना उबाटा गटाचे उपनेते बबन दादा पाटील , शिवसेना उबाटा गटाचे जिल्हा प्रमुख शिरीष घरत, राष्ट्रवादीच्या महाराष्ट्र प्रदेश महिला उपाध्यक्ष भावना घाणेकर, मनसे नेते योगेश चिले , शेकापचे अतुल म्हात्रे यांच्या सह कार्यकर्ते व पनवेलकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नुसती शास्ती नाही तर संपूर्ण कर माफी व्हावी ही घोषणा करण्यात आली पालिकेच्या आवरात झालेल्या मोर्चात पोलिसांच्या मध्यस्थीने एक शिष्ट मंडळ पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना भेटून निवेदन देण्यात आले आमच्या मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस याना पोहचवा व लवकरात लवकर त्यांच्या सोबत आमची बैठक लावा अशी विनंती आयुक्त कडे करण्यात आली. जर लवकरात लवकर मुख्यमंत्र्यांन सोबत बैठक लावली नाही अथवा यावर तोडगा काढला नाही तर गणपती संपल्यावर उग्रआंदोलन करून पालिकेचे कामकाज बंद पडू असा इशारा बाळाराम पाटील यांनी दिला

# गणेशोत्सवासाठी नवी मुंबई पालिका सज्ज; आयुक्तांकडून सुव्यवस्थेचे निर्देश



**नवी मुंबई** – गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यानिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण असून गणेशोत्सव सुनियोजितपणे पार पडावा या उद्देशाने नवी मुंबई पालिकेच्यावतीने विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. यामध्ये रस्ते दूरुस्ती, मंडप परवानग्या, पाणी पुरवठा, वाहतूक नियोजन, खासगी वाहन सेवा, सीसीटिव्ही कॅमेरे असणार आहेत. नवी मुंबई पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यावतीने शासकीय प्राधिकरणे आणि श्रीगणेशोत्सव मंडळांच्या नियोजन बैठकीत यासंबंधीचे निर्देश देण्यात आले आहेत. नवी मुंबई आधुनिक शहर म्हणून नावाजले जात असते. नवी मुंबईत श्रीगणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि सुनियोजित साजरा व्हावा याकरिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यावतीने विविध निर्देश श्रीगणेशोत्सव मंडळांच्या नियोजन बैठकीत देण्यात आले आहेत. यामध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळांना देण्यात येणाऱ्या मंडप परवानगीसाठी १४७ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती देण्यात आली. मागील वर्षी मंजूरीचा आढावा घेऊन इतरही मंडळांनी परवानगी घ्यावी याबाबत आवाहन देखील करण्यात आले. त्याचप्रमाणे गणेशोत्सवासाठी मूर्ती आणतांना आणि विसर्जनासाठी जात असताना नागरिकांना त्रास होऊ नये यादृष्टीने रस्त्यावरील खड्डे दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा वाहनांचे पार्किंग होत असल्याने वाहतुकीला मोठया प्रमाणावर प्रतिबंध निर्माण होत असतो. याकरिता वाहतुक पोलीस विभागाचे सहकार्य घेऊन रस्ते वाहतुकीसाठी मोकळे राहतील अशाप्रकारे कार्यवाही कराण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. त्याचबरोबर, पाणी पुरवठा आणि स्वच्छतेबाबत नियोजनाचे आदेश दिले. तसेच निर्माल्याचे संकलनकरून विल्हेवाट करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सव सजावटीत पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा याविषयी व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, गणेशोत्सव काळात सर्वत्र मोठया प्रमाणावर होर्डिंग, बॅनर लावून शहर विद्रूपीकरण केले जाते. याकरिता विभाग कार्यालयांनी गणेशोत्सव मंडळांना नियमानुसार परवानगी घेऊनच होर्डिंग / बॅनर लावण्याचे सूचित करावे असे निर्देशीत करण्यात आले. अनधिकृत बॅनरवर कारवाई केली जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

गणेशोत्सव कालावधीत मोठया प्रमाणावर नागरिक गावी जात असतात. याकरिता महामार्गांवर नागरिकांना सार्वजनिक वाहनांची वाट पाहावी लागते. नागरिकांचा हा त्रास वाचण्यासाठी बस डेपोच्या ठिकाणी ही खाजगी वाहने आल्यास नागरिकांना सोयीचे होईल हे लक्षात घेऊन त्याप्रकारे वाहतूक विभागाच्या पोलीसांच्या सहकार्याने नियोजन करण्याचेही आदेश देण्यात आले.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, वाहतूक पोलीस उपआयुक्त तिरुपती काकडे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे आणि परिमंडळ दोन उपआयुक्त संजय शिंदे, परिवहन व्यवस्थापक योगेश कडूसकर, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, अतिक्रमण उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ. अजय गडदे आणि स्मिता काळे तसेच सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.



पाटोदा वकील संघाची २०२५ साठी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी ॲड. अण्णासाहेब लवुळ, उपाध्यक्षपदी ॲड.जब्बार पठाण, सचिवपदी ॲड. विलास पवार, कोषाध्यक्ष ॲड.विशाल मस्के, ग्रंथालय प्रतिनिधी ॲड. अविनाश जगदाळे, महिला प्रतिनिधी ॲड.श्वेता कराड(राख), प्रसिद्धी प्रमुख ॲड.महेश बेदरे यांची निवड करण्यात आली.

**(छाया-दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## पत्रकार श्री डी. टी. आंबेगावे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष व सत्य पोलीस टाइम्सचे संपादक श्री डी टी आंबेगावे यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले आहे. सन २०१८ ते २०२५ या कालावधीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना यशवंतराव चव्हाण फाऊंडेशन मुंबईच्या वतीने गौरविण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रीय खनिज विकास महामंडळ भारत सरकार स्वतंत्र संचालक राज्यमंत्री दर्जा, मिनिस्ट्री ऑफ स्टिलचे नामदार भरत नाना पाटील, आमदार विक्रांत दादा पाटील, ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे बापू, महेश म्हात्रे, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष जयप्रकाश पवार, युवा अध्यक्ष नितीन शिंदे, शिवसेनेच्या महिला नेत्या रंजनाताई शिंत्रे, संजय सावंत, **पान २ वर**






## सिल्लोड मध्ये " हर घर तिरंगा " अभियानांतर्गत तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :**

– 15 ऑगस्ट 2025 रोजीच्या स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने " हर घर तिरंगा" अभियान अंतर्गत सिल्लोड नगर परिषदेच्या वतीने आज सिल्लोड शहरात मोटारसायकल तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषदेचे मुख्याधिकारी कारभारी दिवेकर यांच्याहस्ते तर पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंगा रॅलीचे उद्‌घाटन संपन्न झाले.

शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते प्रियदर्शनी चौक पर्यंत ही रॅली काढण्यात आली होती. स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने दिनांक 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधी " हर घर तिरंगा "अभियान राबविण्यात येत आहे. " हर घर तिरंगा " या अभियानात नागरिकांनी सहभागी होवून स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा असे आवाहन नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले.

या रॅलीमध्ये माजी नगरसेवक विठ्ठल सपकाळ , शंकरराव खांडवे, प्रशांत क्षीरसागर, सुधाकर पाटील ,मनोज झंवर, तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल,कृउबा समितीचे संचालक शेख जावेद , सयाजीराव वाघ, युवासेनेचे शिवा टोम्पे, मानसिंग राजपूत, मुस्ताक देशमुख, मतीन देशमुख ,कुणाल सहारे , संदीप हाडोळे ,महेश पाटील, फहिम पठाण यांच्यासह उपमुख्याधिकारी आयुब बाबा सय्यद, प्रशासकीय अधिकारी जुबेर सिद्दीकी, प्रकल्प अधिकारी देवेंद्र सूर्यवंशी, आस्थापना अधिकारी विशाल वाघ, प्रधानमंत्री आवास योजनेचे समनव्यक ओंकार महाजन, सुनीता आरके, शेख अजीम, सतिश सुर्यतळे, श्रीराम काथार, छोटुराम दुधे, अन्वर पठाण, शेख अजीम, सहाय्यक कक्ष प्रमुख दीपक दाभाडे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी , कर्मचारी आदींसह नागरिकांची उपस्थिती होती.

## सुषमा पाटील विद्यालय 'शाळा अंतर्गत' फेरीसाठी विद्यार्थी सज्ज; गुरुवारी 'शाळा अंतर्गत' फेरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या शाळा अंतर्गत फेरीसाठी सुषमा पाटील विद्यालय कामोठे येथील विद्यार्थी उत्साहात तयारी करत आहेत. त्या अनुषंगाने गुरुवार दिनांक १४ ऑगस्ट होणाऱ्या या फेरीत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे एकूण २१५ विद्यार्थी या स्पर्धेत वक्तृत्व कौशल्य सादर करणार आहेत. या फेरीतून एकूण २४ विद्यार्थी आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, इंटरनेट – वरदान की शाप?, प्लास्टिक मुक्त भारत अशा विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. विषयाची मांडणी व सुसंगता, देहबोली, स्वच्छ आणि स्पष्ट आवाज, वक्तशीरपणा, भाव आणि आवाजातील चढ-उतार हे गन या स्पर्धेत महत्वाचे ठरणार आहे. अशा स्पर्धा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतात, संवादकौशल्य विकसित करतात आणि त्यांच्यात नेतृत्व गुण रुजवतात. कोशिश फाउंडेशनच्या पुढाकारातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम यशस्वीपणे राबवला जात आहे. त्यानुसार गुरुवारी कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात शाळा अंतर्गत फेरीसाठी विद्यार्थी सज्ज झाले आहेत.

## श्री क्षेत्र चिंतामणी, कळंब येथे अंगारिका चतुर्थी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे**

कळंब :-तालुक्यातील सुप्रसिद्ध श्री क्षेत्र चिंतामणी येथे मंगळवारी अंगारिका चतुर्थीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती.गणरायाच्या जयघोषात आणि गजरात भक्तांनी रांगा लावून दर्शन घेतले. सकाळपासून सुरू झालेल्या धार्मिक विधी,अभिषेक,महाआरती व भजन-कीर्तन कार्यक्रमांनी वातावरण अधिकच मंगलमय झाले.दूरदूरवरून आलेल्या भाविकांनी श्रद्धेने व नवसाने श्री गणरायाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात आणि गावात दिवसभर उत्सवी माहोल पाहायला मिळाला. उत्सवासाठी स्थानिक ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी व्यवस्था सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली. पोलिस व प्रशासनाकडून वाहतूक व सुरक्षेची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.



## गोर गरिबांच्या सेवेसाठी शासनाच्या जनआरोग्य लाभासह स्टार सर्जिकल अ‍ॅन्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्याचा स्तुत्य निर्णय -माजी आ. बापूराव राठोड

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

किनवट : वैद्यकीय शिक्षणात सुपर स्पेशालिटी संपादून अनेक डॉक्टर्स परदेशी जातात. परंतु डॉ. राजीव राठोड व डॉ. प्रथमेश राठोड ह्या निष्णात तज्ज्ञांनी आपला जन्म झालेल्या आदिवासी डोंगरी भागात शासनाच्या जनआरोग्य लाभासह स्टार सर्जिकल अन्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करून समाजातील गोर गरिबांची सेवा करण्याचा घेतलेला धाडसी निर्णय स्तुत्य आहे. वैद्यकीय वा अन्य क्षेत्रातील लोकांनीही आपापल्या भागात सेवा देण्याच्या या वृत्तीचे अनुकरण केल्यास देशाचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन तेलंगणातील बोधचे माजी आमदार बापूराव राठोड यांनी केले.

ते येथील नवीन डॉक्टर लाईनमध्ये स्टार सर्जिकल अन्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल , शासनमान्य प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना शुभारंभ प्रसंगी अध्यक्षीय समारोप करतांना बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी भाजपा नेते सुधाकर भोयर , जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव , उत्तराखंड येथे कार्यरत सीआरपीएफचे डॉ. सुरेश राठोड यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. प्रसिद्ध किडनी ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. राजीव राठोड यांनी प्रास्ताविक केले. उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

यावेळी मुंबईतील प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. चेतन राठोड , गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने , डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बालरोग विभाग प्रमुख डॉ. किशोर राठोड , नायब तहसिलदार डॉ. कृष्णा राठोड , डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बालाजी नागरगोजे , उपाध्यक्ष डॉ. वसंत बामणे , निवृत्त अभियंता शिवलाल चव्हाण , जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड , माजी नगराध्यक्ष हाजी इसाखान , अरुण आळणे, आनंद मच्छेवार , भाजपा प्रदेश सदस्य धरमसिंग राठोड , शिवराज राघू मामा , माजी जि.प सदस्य बंडू नाईक , योग तज्ज्ञ अखिल खान , राकाँपाचे विधानसभा अध्यक्ष वैजनाथ करपुडे पाटील ,शिवसेना तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे , भाजपा उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे , शिवसेना युवा तालुकाध्यक्ष अजय कदम , बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे , सरपंच उत्तम मेश्राम, माजी नगरसेवक प्रवीण राठोड , जहिरोद्दीन खान , अड उदय चव्हाण, युसूफ खान , समन्वय समिती माजी अध्यक्ष विनोद राठोड , आत्माराम मुंडे , किसन ठमके , कमलाकर कंचर्लावार , दिशा समिती माजी सदस्य मारोती सुंकलवाड , नरसिंग राठोड , राहूल राठोड , अरविंद चव्हाण , युवामोर्चा अध्यक्ष आशुतोष बेद्रे , छावाध्यक्ष संतोष डोणगे , डॉ. उषा देशमुख , पत्रकार दुर्गादास राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती.



यांप्रसंगी दोन्ही डॉक्टरांचे वडील निवृत्त विस्तार अधिकारी रेवाजी राठोड व शिक्षण विस्तार अधिकारी प्रताप राठोड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते संजय कदम यांनी डॉ. राजीव राठोड व डॉ. प्रथमेश राठोड यांचा छत्रपती शिवरायांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते फीत कापून शुभारंभ करण्यात आला.

डॉ. राजीव रेवाजी राठोड , डॉ. प्रथमेश प्रताप राठोड , डॉ. सोनाली राजीव राठोड , डॉ. तेजश्री प्रथमेश राठोड , डॉ. बालाजी तेलंग , डॉ.शिवकुमार केंद्रे , गोपाल पवार , विशाल जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## पत्रकार श्री डी. टी. आंबेगावे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**पान १ वरून** पत्रकार प्रकाश शिर्के, अमोल वाटवे, गौराज जाधव, एकनाथ तांबवेकर, रिंकू खरे आदी मान्यवर उपस्थित होते. डी टी आंबेगावे विविध क्षेत्रांत कार्य करीत आहेत. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढा, गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी व मजुरांसाठी लढा, कोविड काळात, गोर गरीब कुटुंबांना अन्नधान्य व कपड्यांचे वाटप, महापुरुषांच्या जयंतीनिमित जागर, अपघातग्रस्त पत्रकारांस मदत, पत्रकारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात मदत, वृक्षारोपण, अनाथ मुलांना पुस्तकं व खाऊ वाटप, वृद्धाश्रमातील आजी आजोबांना जीवनावश्यक वस्तूंची मदत, पत्रकार व नागरिकांसाठी पत्रकार शिबिराचे आयोजन, कोविड काळात ड्युटीवर तैनात असलेल्या पोलीस बांधवांना मास्क व नाश्ता, पत्रकारांचा अभ्यास दौरा, दिव्यांग बांधवांना छत्री वाटप, वारकऱ्यांना प्रसाद वाटप, अपघातग्रस्त व्यक्तीस मदत, रुग्णांना फळं वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, विद्यार्थ्यांसाठी मोफत व्याख्यान, पत्रकारावर होणारे हल्ले व खोटे गुन्हे थांबवणे, पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना पोलीस संरक्षण, कोविड काळात मास्कचे वाटप, रक्तदान शिबिराचे आयोजन, कोविड काळात कुटुंबांना घरपोच किराणा, पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयाकडे पाठपुरावा, कोविड काळात भिंतीवर पेंटिंग करून जनजागृती, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पत्रकारिता आदी क्षेत्रांत डी टी आंबेगावे उल्लेखनीय कार्य करीत आहेत. सदर पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आदी मान्यवर उपस्थित होते. डी टी आंबेगावे यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे सर्व पदाधिकारी, पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पिलीव व परिसरात श्रावण महिन्यानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न होताहेत

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर)**



:-पिलीव व परिसरात श्रावण महिन्याच्या निमित्ताने गावोगावी श्री महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविक भक्तांची लगबग सुरू असून पिलीव येथील मुख्य पेठेतील श्री महादेव मंदिरात व गावाच्या उत्तरेला असलेल्या खडीच्या श्री महादेव मंदिरामध्ये भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी बहु गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे. पिलीव या ठिकाणी जुना पुराना परंतु सर्वांना आवडीचा असणारा गजी ढोल खेळ असतो. ग्रंथवाचन, भजन असे धार्मिक कार्यक्रम सुरू असून "श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे"याप्रमाणे थोड्याफार प्रमाणात पाऊस असल्याने निसर्ग सुद्धा श्रावण महिन्याचे स्वागत करीत असल्याचे दिसते. पिलीव व पिलीव परिसरातील गावांमध्ये भाविक भक्त श्री महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी बहु गर्दी करीत असल्याचे समजते.

# वोटचोरी विरोधात नेवाशात काँग्रेससह विविध संघटनाचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी:-लखन वाल्हेकर )**

वोट चोरीच्या निषेधार्थ आज काँग्रेस कमिटी व विविध संघटनाकडून नेवासा तहसील कार्यालयावर मोर्चा काढत मोदी सरकार व निवडणूक आयोगाचा निषेध करण्यात आला.

देशात झालेल्या लोकसभा निवडणूकित व चार राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान हेराफेरी झाल्याचे निष्पन्न झाले आहे.याविरोधात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बैंगलोर येथे पुराव्यासह आपले म्हणणे देशातील नागरिकांसमोर सादर केले. यात निवडणूक आयोग दोषी ठरला आहे. मागील निवडणूकामध्ये मोठया प्रमाणात मतदान चोरी होऊन भाजपा सरकार सत्तेत बसविण्यात आले आहे.याविरोधात राहुल गांधी यांच्या नेतृत्वात इंडिया आघाडीकडून दिल्ली येथे मोठे आंदोलन या आंदोलनात इंडिया आघाडीच्या नेत्यांना अटक करण्यात येऊन जेलमध्ये टाकले गेले.या घटनेचे देशभर पडसाद उमटले. आज नेवासा तालुक्यात काँग्रेस कमिटी, वंचित बहुजन आघाडी, भारतीय स्वाभिमानी संघ, प्रहार शेतकरी संघटना यांच्याकडून नेवासा तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी मागील पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूका या रद्द करण्यात अशी मागणी केली.



नेवासा विधानसभा निवडणुक मतदान डेटाची मागणी*
वोट चोरी हा देशभरातील महाघोटाळा असून नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकित नेवासा तालुक्यात सुद्धा मोठया प्रमाणात बोगस मतदान झाल्याची शक्यता नाकरता येत नाही त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्याने झालेल्या मतदानाचा डेटा उपलब्ध करून द्यावा. ज्यामुळे नेवासा तालुक्यात काही घोटाळा झाला असेल तर उघड करणे शक्य होईल - संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी वोट चोरी विरोधात तालुक्यात मोठे जण आंदोलन उभारणार. वंचित बहुजन आघाडीचे पोपट सरोदे यांनी मोदी सरकार हे लोकशाही पद्धतीने आलेले सरकार नसून हे निवडणूक आयोगाने आणलेले हुकूमशाही सरकार आहे.गणपत मोरे यांनी भाजपा सरकारनी वोट चोरी करून संविधानाची हत्या केली असून संविधान वाचविण्यासाठी हा लढा आहे. प्रहारचे अध्यक्ष पांडुरंग औताडे यांनी सर्व समविचारी पक्ष व संघटना एकत्रित येऊन या विरोधात लढा देऊ असे स्पष्ट केले.

या आंदोलनावेळी नेवाशाचे निवडणूक अधिकारी गोसावी साहेब यांच्याकडे मागील विधानसभा निवडणुकीचा झालेल्या मतदान संदर्भात डेटा मागणी करण्यात आली. तसेच यावेळी मोदी सरकार व निवडणूक आयोगाच्या निषेधाचे निवेदन तहसीलदार याना देण्यात आले.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे इरफान शेख,सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे,संजय वाघमारे,संजय होडगर, बाबासाहेब मिसाळ, विजय गोरे,गोरख बर्वे आदी उपस्थित होते.

# पी.एम.श्री.शाळा मुळेखंड उरण येथे मोफत आरोग्य शिबिर संपन्न.

**"माता पालकांनी आपले कोणतेही आजार न लपवता डॉक्टरांना सांगून आपल्या तब्येतीकडे लक्ष देणे गरजेचे.": स्त्री रोग तज्ञ डॉ.राहुल कुमार.**

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण, जायंट्स ग्रुप ऑफ उरण , आई माऊली महिला ग्राम संघ,व मुलेखंड शाळेच्या संयुक्त विद्यमाने पी.एम.श्री.शाळा उरण या शाळेत माता पालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर रविवार दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते.

सामाजिक संस्था या समाजातील गरजा पूर्ण करण्यासाठी गरीब, गरजू व दुर्बल घटकांना आपल्या संस्थेकडून मदतीचा हात पुढे करून सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्याच्या बाबतीत आपले योगदान देत असतात. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण व जॉइंट्स ग्रुप उरण कडून नेहमीच समाजाभिमुख उपक्रम राबवले जात असतात. दिनांक १० ऑगस्ट रोजी पीएमश्री शाळा उरण मध्ये राबवण्यात आलेल्या या उपक्रमासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी बालरोग तज्ञ डॉ. विकास मोरे व डॉक्टर अजय कोळी, स्त्री रोग तज्ञ डॉ. राहुल कुमार डॉ. अंकिता डेरे, डॉ.वैभव गुरसाळे ,पंचायत समिती उरणचे राम मदने,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनीषा म्हात्रे, स्थानिक प्राधिकरण सदस्य उज्वला ताई म्हात्रे ,फिरोज पठाण ,श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता उरण व जायंट्स ग्रुप ऑफ उरण च्या अध्यक्षा संगीताताई ढेरे ,जायंट्स ग्रुप ऑफ उरणचे माजीअध्यक्ष देवेंद्र पिंपळे, रोशनलाल मेहता, प्रियवंदा तांबोटकर ,वासल्य फाउंडेशन सॅनिटरी नॅपकिन च्या प्रायोजक माधवी कोळी ,आई माऊली बचत गट अध्यक्षा अनुताई पाटील व सर्व सदस्या, शाळेचे



मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील उपक्रमशील शिक्षक होळकर सर यांनी शाळेच्या वतीने उपस्थितांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर तांबोटकर मॅडम यांनी आरोग्य विषयी प्रास्तावित केले. तदृनंतर डॉ.राहुल कुमार यांनी स्त्रियांच्या कॅन्सर या आजाराविषयी सखोल माहिती दिली. या आजाराची लक्षणे ती कशी ओळखावी व त्यावरील उपाययोजना सांगितल्या .डॉ. विकास मोरे यांनी स्तनपान आठवडा निमित्ताने स्तनपान या विषयावर माता पालकांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. माधवी कोळी मॅडमनी सॅनिटरी नॅपकिन ची माहिती व वाटप केले. बालरोग तज्ञ डॉ.अजय कोळी यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली व जंतुनाशक गोळ्या, खोकला, सर्दी ,ताप यावर औषध वाटप केले. डॉ राहुल कुमार व डॉ.वैभव गुरसाळे व अंकिता डेरे यांनी महिलांची कॅन्सर तपासणी करून मार्गदर्शन केले. महिला व मुले मिळून जवळपास ६० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मयूर मेडिकल दीपेश शहा यांच्या सौजन्याने मोफत औषधे देण्यात आली.

हे आरोग्य शिबिर सुंदरीत्या संपन्न होण्यासाठी श्री समर्थकृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण च्या अध्यक्ष संगीताताई ढेरे, कविता म्हात्रे ,वैशाली पाटील मंजू कुमार ,तृप्ती भोईर,सचिन ढेरे ,सागरी महिला प्रभाग संघ सदस्या नायना पाटील, निशा म्हात्रे, तृप्ती घरत, सुप्रभा म्हात्रे, शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर, शाळा व्यवस्थापन समिती ,ओम साई महिला बचत गट यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार होळकर सर यांनी मांडले.

## कावड यात्रेत संयम,धार्मिकता व साऊंड मर्यादेचे पालन करा - पोलीस निरीक्षक संजय चौधरी.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम करण धोंगडे.**

**मालेगाव** : - आगामी कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी सर्व कावड भक्तांना संयम, शिस्त आणि धार्मिकतेचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. कावड यात्रा ही पवित्र श्रद्धेची आणि भक्तीची परंपरा असल्याने ती शांततेत व नियमानुसार पार पाडणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले पोलीस निरीक्षक चौधरी म्हणाले की, “आपल्या कावड मंडळाच्या प्रतिष्ठेला कुठलाही गालबोट लागू नये याची काळजी घ्या आपण गावागावांतून पायदळ कावड घेऊन येतो, त्यामुळे तिचे महत्त्व जपणे आपले कर्तव्य आहे नियम व परंपरा पाळून, एका ओळीत आणि नम्रतेने यात्रा काढा.” तसेच, त्यांनी यात्रेदरम्यान केवळ ‘भोलेनाथ’च्या भक्तिगीते वाजविणे अपेक्षित आहे; अश्लील तसेच धार्मिक भावना दुखावल्या जातील असे कोणत्याही प्रकारचे गाणे वाजवू नये, असे स्पष्ट केले. डीजे किंवा साऊंड सिस्टमचा आवाज मर्यादित ठेवावा, जेणेकरून नागरिक, रुग्णालयातील रुग्ण,विद्यार्थी किंवा वयोवृद्धांना त्रास होणार नाही कोणालाही त्रास होईल असे कृत्य करू नये, तसेच गर्दीत ढकलाढकली टाळावी, असेही त्यांनी सांगितले चौधरी यांनी सांगितले की, शांततेत, शिस्तबद्धतेने आणि धार्मिक पद्धतीने यात्रा काढल्यास भक्तीचा खरा संदेश समाजापर्यंत पोहोचेल त्यांनी सर्व कावड मंडळांना पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करत “भक्तीची ही वाट प्रेम, शिस्त आणि श्रद्धेने सजली पाहिजे” असा संदेश दिला.!




**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# जागतिक अवयवदान दिनानिमित्त अपोलोने ६६० हून अधिक अवयव प्रत्यारोपीत रुग्णांना जीवनदान दिले

## आपला एक 'हो' आठ लोकांना नवसंजीवनी देऊ शकतो

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर**

१३ ऑगस्ट २०२५ : अंतःकरण अशांत असतानाही, बुद्धी शांत ठेऊन घेतलेला एक निर्णय अनेकांच्या जीवनात आशा निर्माण करू शकतो. जागतिक अवयवदान दिनानिमित्त, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने (AHNM) अशा दात्यांच्या धैर्याचा, दान प्राप्तकर्त्यांच्या लवचिकतेचा आणि अवयव प्रत्यारोपणामुळे घडून येणाऱ्या, जीवन बदलवून टाकणाऱ्या परिणामाचा सन्मान केला – नव्या जीवनाकडे नेणारा एक असा प्रवास जो विज्ञान, कौशल्य आणि मानवता एकत्र येऊन घडवून आणतात.

प्रत्यारोपणासाठी पश्चिम भारतातील एक अग्रगण्य केंद्र म्हणून, अपोलोने प्रतिष्ठा मिळवली आहे. २०१७ पासून, या रुग्णालयाने ४०८ मूत्रपिंड




प्रत्यारोपण, २२९ यकृत प्रत्यारोपण, ११ हृदय प्रत्यारोपण आणि १३ कॉर्निया प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या आहेत, यातील प्रत्येक केस जीवन जगण्याची दुसरी संधी दर्शवते, गेल्या दशकात भारताने अवयव प्रत्यारोपणात लक्षणीय प्रगती केली आहे, तरीही मागणी आणि उपलब्धता यांच्यातील वाढती तफावत हे एक गंभीर आव्हान आहे. राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संघटनेच्या (NOTTO) च्या माहितीनुसार, दरवर्षी हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत असल्याने, यकृत, मूत्रपिंड आणि हृदय प्रत्यारोपणाची मागणी सतत वाढत आहे, अवयवदानाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. परंतु सक्रिय सरकारी कार्यक्रम, रुग्णालयाकडून चालवले जाणारे उपक्रम आणि वाढती जनजागृती यामुळे महाराष्ट्र अवयवदानात आघाडीवर असलेले एक राज्य आहे.

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई, जागरूकता पसरवण्याच्या आणि कृतीला प्रेरणा देण्याच्या आपल्या दृढ वचनबद्धतेनुसार, 'एक हो आठ जीवनांसाठी' ही प्रतिज्ञा प्रामाणिक समुदाय सहभाग आणि व्यापक प्रचाराच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवत आहे. मॉल्समध्ये जागरूकता मोहीम आणि मोफत अवयव तपासणी शिबिरे यासारख्या ऑफलाइन उपक्रमांमुळे या विषयावर संवादाला चालना मिळते, ज्यामुळे लोकांना प्रतिज्ञा घेण्यास प्रोत्साहित केले जाते आणि त्यांच्यासाठी ते खूप सोपे देखील ठरते. पाच लाखांहून अधिक नवी मुंबईकरांपर्यंत पोहोचणे आणि त्यांना सहभागी करून घेणे, संवादाला प्रोत्साहन देणे आणि अवयव दानाविषयीचे गैरसमज दूर करणे या उद्देशाने ऑनलाइन आणि सोशल मीडिया मोहिमा राबविल्या जातील. ८ ऑगस्ट रोजी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने रुग्ण समर्थन बैठक आणि सत्कार समारंभ आयोजित करून अवयव दाते, प्राप्तकर्ते, त्यांची कुटुंबे आणि देखभाल करणाऱ्या टीमना एकत्र आणले.

डॉ.अमेय सोनवणे, हेपॅटोलॉजी-लिव्हर ट्रान्सप्लांटचे सीनियर कन्सल्टन्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"प्रत्येक प्रत्यारोपण हे केवळ वैद्यकीय कामगिरीपेक्षाही जास्त मानवी नातेसंबंधांची कहाणी आहे. प्रत्येक शस्त्रक्रियेमागे एक कुटुंब असते ज्यांनी त्यांच्या सर्वात कठीण काळात 'हो' म्हटले आणि त्यांचे दुःख दुसऱ्यासाठी जीवनादानामध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा एक 'हो' अवयव निकामी झाल्यामुळे मृत्यूशी झुंजणाऱ्या व्यक्तीसाठी जीवनरेखा बनते. रुग्णांनी आमच्यावर ठेवलेला विश्वास आम्ही पवित्र मानतो आणि अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे, आम्ही त्या विश्वासाचा आदर करतो, काळजीपूर्वक, अचूक शस्त्रक्रिया, प्रगत पोस्ट-ऑपरेटिव्ह देखभाल आणि प्राप्तकर्त्यांप्रती आयुष्यभराची वचनबद्धता. आमची भूमिका ऑपरेशन थिएटरमध्ये संपत नाही - आम्ही याची पुरेपूर काळजी घेतो की प्रत्येक प्राप्तकर्ता पूर्णपणे जगू शकेल, स्वतःच्या कुटुंबांकडे परत जाऊ शकेल आणि आजाराने त्यांच्यापासून हिरावून घेतलेल्या क्षणांना पुन्हा जगू शकेल."

डॉ.अमित लंगोटे, सिनियर कन्सल्टन्ट, नेफ्रोलॉजी, किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन आणि हायपरटेन्शन स्पेशालिस्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"एक अवयवदाता आठ जणांचे जीव वाचवू शकतो - आणि त्याचा परिणाम त्या आठ जणांच्या कुटुंबांवर, मित्रांवर आणि संपूर्ण समुदायावर होतो. मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे केवळ आरोग्याचे अडचणीत येते असे नाही तर उपजीविका आणि भावनिक कल्याणातही व्यत्यय येऊ शकतो. प्रत्यारोपण केवळ अवयवांचे कार्य सुरळीत करत नाही तर, आशा, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा देखील पुन्हा मिळवून देते. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे, आम्ही एक कार्यक्रम तयार केला आहे जो या प्रत्यारोपण प्रवासाच्या प्रत्येक पैलूची नीट काळजी घेतो- प्रत्यारोपणापूर्वीच्या संपूर्ण निदानापासून ते दीर्घकालीन रिहॅबिलिटेशनपर्यंत प्रत्येक बाबतीत आम्ही हाच मानक शोधतो."

---

## धारणगाव खडक येथे ३८ वर्षीय शिक्षक पत्नीची आत्महत्या

### सासरच्यांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा माहेरच्यांचा आरोप

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



विंचूर : निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथील ३८ वर्षीय शिक्षक पत्नी शितल भाउसाहेब पगारे हिने घराच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर माहेरच्या मंडळींनी पतीचे अनैतिक संबंध आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या छळामुळेच आत्महत्या घडल्याचा गंभीर आरोप केला आहे.

या प्रकरणी राहुल यशवंत भोसले, वय २३, रा. पिंपळस रामाचे, ता. निफाड यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, मयत शितलचा विवाह दि.२ मार्च २००८ रोजी भाऊसाहेब मधुकर पगारे यांच्याशी झाला. विवाहानंतर आज पावेतो सासू मंदाबाई मधुकर पगारे, दीर राहुल मधुकर पगारे, मामा सासरे सुरेश मोतीराम सोनवणे आणि पती भाऊसाहेब यांनी संगनमत करून वेळोवेळी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला.

हुंड्याच्या कारणावरून तसेच पहिली अपत्य मुलगी झाल्याने 'तुला घरातील काम नीट जमत नाही' अशा टोमण्यांनी तिचा अपमान केला जात असे. हाताने मारहाण, शिवीगाळ, दमदाटी यासह पतीने विवाहबाह्य संबंध ठेवून वारंवार आत्महत्येस प्रवृत्त केले. त्यामुळेच दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता शितलने गळफास घेतला असे म्हटले आहे.

या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १९४/२०२५ भा.न्या.सं.कलम १०८, ८५, ११५(२), ३५२, ३५१(२) तसेच महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पती भाऊसाहेब पगारे, राहुल पगारे व सुरेश सोनवणे या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. स.पो.नि. भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे अधिक तपास करीत आहेत. सदर घटनेने परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नि. भास्कराव शिंदे, पो.उपनिरीक्षक पवन सुपनर, किरण साळुंखे, पो.हवा. संदीप शिंदे, बाळासाहेब कांदळकर, औदुंबर मुरडनर, अविनाश सांगळे, सागर आरोटे, पो.पा.राहुल सोनवणे आदींच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. माहेरच्यांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. पोलिसांनी अटक करण्याचे आश्वासन दिल्यानंतर रात्री दोन वाजता मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

## नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सने केला अवयवदात्या कुटुंबियांचा सन्मान

### जागरूकता सत्राच्या माध्यमातून पटवून दिले अवयव दानाचे महत्त्व

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई: प्रतिनिधी**

जागतिक अवयवदान दिनानिमित्त अवयवदान करणाऱ्या व्यक्तींच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करत नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सने अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना यावेळी सन्मानित केले. आपल्या प्रिय व्यक्तीचे अवयव दान करून गरजुंना नवे आयुष्य देणाऱ्या कुटुंबीयांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि इतरांना त्यांच्या कार्याचे अनुसरण करण्यास प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश होता. रुग्णालयाने अवयवदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी आणि त्याबाबत असलेले गैरसमज करण्यासाठी डॉक्टर, प्रत्यारोपण समन्वयक आणि दात्या कुटुंबियांच्या उपस्थित जनजागृती व्याख्यान आणि संवादात्मक सत्राचे आयोजित केली होते. *या ठिकाणी आयोजित चर्चा सत्रातत डॉ. सनिश श्रृंगारपुरे, डॉ. विकास भिसे, डॉ. अमित नागरीक, डॉ. अमर कुलकर्णी, डॉ. रावसाहेब राठोड, डॉ. दीपक अहिरे आणि डॉ. अदिती जैन यांचा समावेश






होता. मेडिकव्हर हॉस्पिटल्स हे विविध कार्यक्रमांद्वारे अवयवदानाविषयी जागरूकता वाढवत आहे. हा कार्यक्रम केवळ कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच नाही तर इतरांना अवयवदानाबाबत प्रेरणा देणारा होता. जगण्याची दुसरी संधी देणाऱ्या या दात्यांचे स्मरण करून, आम्ही या निस्वार्थ कार्यात सामील होण्यासाठी आम्ही नागरिकांना आवाहन करतो *अशी प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी स्पष्ट केले.*

*दाता कुटुंबातील सदस्य समीर पाटील सांगतात की,* आपल्या प्रिय व्यक्तीला गमावणे हे खरोखरच मन हेलावणारे असते, परंतु त्यांच्या अवयवांनी इतरांना नवीन जीवन दिले हे जाणून आपल्याला त्यांना कायमस्वरूपी स्मरणात ठेवता येते. आमच्या योगदानाची दखल घेणाऱ्या तसेच नागरिकांना अवयव दानाचे महत्त्व पटवून देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित केल्याबद्दल आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे विशेष आभार मानतो. यामुळे आम्हाला असे वाटते की आपल्या प्रिय व्यक्तीचा वारसा हा त्यांनी प्राप्तकर्त्यांच्या माध्यमातून कायमजिवंत राहील. यावेळी उपस्थिताना अवयवदानासाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

---

## नवनाथांचे चरित्र हे कलियुगात भक्ती,शक्ती आणि जीवन जगण्याचे तंत्र शिकवते - मिलिंद चवडके*

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

सप्तशृंगी मातेचे शक्तीपीठ असलेला तुमचा जिल्हा आहे तुम्ही भाग्यवान आहात, देवीचे दर्शन घेतांना मचिंद्रनाथांचे नाव घ्या देवीचे दर्शन होईल. मार्कंडेय पर्वत जवळ आहे तिथे मचिंद्रनाथ शाबरी विद्येची सहा महिने राहिले होते.नवनाथांचे चरित्र हे कलियुगात भक्ती,शक्ती आणि जीवन जगण्याचे तंत्र शिकवते असे प्रतिपादन नाथ संप्रदाय अभ्यासक आणि कानिफनाथ देवस्थान मढीचे विश्वस्त मिलिंद चवडके यांनी केले.



निफाड येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात श्रावण मास, श्री कृष्ण जन्मोत्सव , श्री नवनाथ ग्रंथ सामुदायिक पारायण निमित्ताने निरूपण सप्ताहात निरूपण करतांना चवडके बोलत होते.

निफाडची भूमी ही नाथभूमी आहे या भूमीत नवनाथ भक्तीचा सोहळा हा भक्तांच्या ऐहिक,पारमार्थिक इच्छा पूर्ण करून भक्तिमार्गाची शिकवण देणारा आहे.रोज होणाऱ्या निरुपणात चवडके हे श्री नवनाथ ग्रंथातील अध्यायांचे दृष्टांत आणी अध्यातील ओव्यांचा प्रासादिक वाणीतून अर्थ समजून निरुपण करत आहे. या सप्ताहाचा १६ ऑगस्ट रोजी सांगता समारोह आहे.यावेळी वि.दा.व्यवहारे सर यांनी प्रास्ताविक व सप्ताह आयोजनाचा हेतू समजावून सांगितला.रोज सायंकाळी होणाऱ्या या सोहळ्याला नाथ भक्तांनी हजेरी लावली आहे.

---

## कोकणातील पारंपरिक खेळ नारळ फोडणे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

भारतीय जनता पार्टी कोकण विकास आघाडी मुंबई आयोजित कोकणातील पारंपरिक खेळ नारळ फोडणे हा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती कोकण विकास आघाडीचे संघटन महामंत्री श्री संजय सुर्वे,तसेच कोकण नगर मंडळ अध्यक्ष श्री.रितेश सावंत आणि वॉर्ड अध्यक्ष दिनेश मनसूख यांच्या हस्ते कार्यक्रमाचा




नारळ वाढवून सुरवात करण्यात आली कोकण विकास आघाडी जिल्हा महामंत्री श्री. राजेश आडकर आणि त्यांचे सहकारी, कोकण विकास आघाडी विक्रोळी मंडळ अध्यक्ष श्री. राजू मालाडकर,श्री. नयन राणे, श्री जितेंद्र परब, श्री.चेतन रिंगे श्री. धिरेंद्र सिंग,श्री. राजेंद्र बट्टा, संदीप,बेनेरे, श्री. किरण जाधव, श्री. रुपेश गुरव, आणि महिलांमध्ये प्रमुख उपस्थिती सौ. निखिता घाडीगावकर,सौ. रजनी बालन नायर, सौ. नयना तावडे, वॉर्ड अध्यक्ष 115 सौ पूर्वा माईन, वॉर्ड अध्यक्ष 113 सौ.राजश्री दांडीवाल आणि सर्व महिला शक्ती यांची लाभली आपल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ता तसेच सर्व मान्यवरांचे व सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक आभार.

श्रावणी मिलिंद पारकर भा. ज. पा को. वि. आ

मुंबई उपाध्यक्ष संदीप मांजरेकर

को. वि. आ भांडुप संयोजक मिलिंद पारकर वॉर्ड 115 उपाध्यक्ष

---

## भारतीय संविधानानुसार आरक्षण धोरण ही सकारात्मक कृती--ॲड.डॉ.सत्यपाल कातकर

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

नागपूर-समता सैनिक दल, नागपूर द्वारा दिनांक २७ जुलै २०२५ ला नागलोक कामठी रोड नागपूरला भारतातील आरक्षण धोरणाचा समग्र आढावा घेण्यासाठी आरक्षण शिखर परिषद आयोजित करण्यात आली. सदर शिखर परिषदेत मुख्यवक्ता म्हणून राजुरा रहिवाशी शिक्षणतज्ञ, मनोवैज्ञानिक, डॉ.सत्यपाल कातकर, अधिवक्ता उच्च न्यायालय तथा संविधानतज्ञ आपल्या सखोल व मुद्देसूद मार्गदर्शन करताना बोलत होते.सदर परिषदेचे उदघाटन प्रा. देविदास घोडेस्वार, संविधान सभा डिबेट्स अनुवादक ह्यांनी केले व वर्तमान आरक्षण धोरणवार विस्तृत विवेचनात्मक मार्गदर्शन केले तर विशेष निमंत्रीत म्हणून प्रा.डॉ.इसादास भडके ह्यांनी आरक्षण धोरणात बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे ह्यांच्या मौलिक सहभाग ह्यावर मुद्देसूद संशोधकीय मार्गदर्शन केले.आरक्षण धोरणाचा




समग्र आढावा घेताना अड.डॉ.सत्यपाल कातकर म्हणाले," भारतीय राज्यघटना भारताचे सर्वोच्च कायदेशीर लिखित दस्तावेज आहे.जे देशाच्या शासनाची रचना, मूलभूत नियम आणि तत्वे अधिकार, कार्यपद्धती आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये निश्चित करते तसेच दर्जाची वा संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्यामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासण्याचे अभिवचन देते. ह्या सर्व बाबीचा कायदेशीर दृष्टीने विचार केल्यास आरक्षण धोरण हा संविधानिक सकारात्मक कृतीचा एक भाग आहे आणि त्यांचा प्रभावी अंमल करणे सरकारचे संविधानिक कर्तव्य आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्य समूहाची वास्तव कैफियत ब्रिटिशांसमोर मांडली त्यामुळे आरक्षणास कायदेशीर मान्यता १९३५ च्या कायद्यात तरतूद करण्यात आली व पुढे भारतीय संविधानात अनुच्छेद १५ व १६ मध्ये मूलभूत अधिकार म्हणून सामिल करण्यात आले ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फार मोठे योगदान आहे परंतु वर्तमान सरकार नौकरी आणि शिक्षणामध्ये संविधान अनुच्छेद मध्ये सुधारणा करून अर्थात एका आठवड्यात १०३ वी घटना दुरुस्ती करून श्रीमंताना गरीब समजून आरक्षण केंद्र सरकार ने दिले तर महाराष्ट्र राज्य सरकार ७२ टक्के आरक्षण खैरातीसारखे वाटले आहे तसेच पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती ४०:६० टक्के राज्य व केंद्र सरकार तरतूद करून सदर योजना बंद करण्याचे षडयंत्र सुरु आहे,त्यामुळे अनुसूचित जाती, जमाती वा इतर मागासवर्गीय प्रवर्गास देण्यात आलेल्या नोकरीत वा शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षणाची मूळ उद्दिष्टे समाप्त होण्याच्या मार्गावर आहेत.वाढते खाजगीकरण ह्याचाच एक भाग होय देशात १८ लाखाचे वर खाजगी कंपन्या आहेत वा ४९७ खाजगी विद्यापीठे वा इतरही खाजगी संस्था आहेत जिथे आरक्षण धोरण लागू होत नाही म्हणून सरकारने वंचिताना न्याय देण्यासाठी खाजगीकरणामध्ये कायदा करून आरक्षण धोरण लागू करावे असे समग्र आरक्षणाचा आढावा घेताना समता सैनिक दलच्या वतीने आयोजित आरक्षण शिखर परिषदेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून परिषदे करीता उपस्थित विद्वान प्रतिनिधीस मौलिक मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रदीप गायकवाड,राष्ट्रीय संघटक, समता सैनिक दल हे होते तर सूत्रसंचालन शेखर गायकवाड ह्यांनी केले तर आभारप्रदर्शन आयुष्यमती अनिता बडोले ह्यांनी केले, त्यानंतर वेगवेगळ्या सत्रात न्यायपालिका आरक्षण, महिला आरक्षण, आरक्षण धोरण व कर्मचारी संघटना, बजेट वाटा, आरक्षण धोरण व युवकांचे स्पंदने ह्यावर वी.एन.आय.टी, नागपूरचे प्रोफेसर डॉ. अवनीकुमार पाटील तर महिला आरक्षण धोरणावर प्रा.अस्मिता अभ्यंकर तर बजेट वर प्रा. संजय अभ्यंकर तथा इतरही मान्यवरांचे वेगवेगळ्या सत्रात मार्गदर्शन केले.

---

## बार्टीमार्फत आयबीपीएस पूर्व प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरु-सीईटीव्दारे निवड

**दैनिक युवक आधार**
**यादव नागपूर प्रतिनिधी**

नागपूर - बार्टी, टीआरटीआय, सारथी आणि आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासासाठी विविध प्रकल्प व योजना राबविल्या जातात. या संस्थांच्या लाभार्थी गटातील युवक आणि युवतींसाठी विविध स्पर्धा परीक्षा, त्यांचे पूर्व प्रशिक्षण, संशोधन तसेच कौशल्य विकास कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. हे सर्व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणांतर्गत राबविले जातात.

सर्वंकष धोरणानुसार बार्टी, टीआरटीआय, सारथी आणि आर्टी या संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी बँक (IBPS), रेल्वे, LIC, NABARD, SBI, RBI, RRB आदी तत्सम विभागातील पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. बार्टीमार्फत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी मिळावी आणि त्यांचा आर्थिक विकास साधावा यासाठी नामांकित खासगी व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांमार्फत हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी बार्टीमार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय, आवश्यक कागदपत्रे इत्यादी माहिती बार्टीच्या अधिकृत संकेतस्थळावर HTTP://BARTI.MAHARASHTRA.GOV.IN उपलब्ध आहे. अर्ज फक्त संकेतस्थळावर दिलेल्या लिंकवरून ऑनलाईन स्वरूपातच स्वीकारले जातील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांची निवड सामायिक प्रवेश परीक्षा (COMMON ENTRANCE TEST – CET) आणि गुणांकन पद्धतीद्वारे करण्यात येईल. यात शैक्षणिक पात्रता, आरक्षण व सीईटीमधील गुण या निकषांच्या आधारे निवड होणार आहे.


अंतिम निवड ही स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संनियंत्रण व अंमलबजावणी समितीमार्फत केली जाणार असल्याची माहिती बार्टी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

# उपविभागीय अधिकारी यांना विविध मुद्द्यांबाबत निवेदन...

**भारतीय शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उबाठा), राष्ट्रीय काँग्रेस च्या वतीने तिव्र अंदोलनाचा इशारा**

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)-**

पाटोदा तालुक्यातील विविध विकासात्मक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत भारतीय शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उबाठा), राष्ट्रीय काँग्रेस पक्षांच्या नेत्यांच्या वतीने पाटोदा उपविभागीय अधिकारी यांना खालील मुद्द्यांबाबत निवेदन देण्यात आले. पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाची मंजुरी देणे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज मुक्ती करणे, सन २०२३ सालातील सतत पावसाच्या खंडामुळे आणि सन २०२४ सालातील सततच्या पावसामुळे शेतकऱ्याचे खरीप पिकांचे



झालेले नुकसान त्या वर विमा कंपनीकडून झालेल्या नुकसानीच्या किती टक्के व कोणकोणत्या पिकासाठी मंजूर केला तो अद्याप मिळाला नाही त्याची सखोल चौकशी करून तो शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा, पाटोदा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळा चालु करण्यात यावी, मांजरा नदीवरील अधुऱ्या अवस्थेत असलेला ब्रिज कम कोल्हापूरी बंधारा पूर्ण करण्यात यावा, संजय गांधी योजनेसाठी २१००० /- हजाराच्या उत्पन्नाची अट शिथील करण्यात यावी, दारिद्रय रेषेचा पुनःसर्वे करण्यात यावा, निराधार योजनेत किमान ५००० /- रुपये वेतन देण्यात यावे, आतंकवाद्यांच्या नावाखाली सामान्य जनतेच्या अधिकारावर बंधन घातलेले जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे, देशात गाजत असलेले मतचोरी प्रकरण भारतीय लोकशाहीला काळीमा फासणारे आहे त्या वर योग्य कार्यवाही करण्यात यावी, पाटोदा तालुक्यातील संजय गांधी / श्रावणबाळ योजनेच्या फाईल (अर्ज) तात्काळ निकाली काढण्यात याव्यात, पाटोदा ग्रामीण रुग्णालय ते शंभर चिरा रस्ता, पाटोदा ते साकत हद्दीपर्यंत रस्ता या बोगस कामाची आणि पाटोदा ते स्मशानभूमी रस्त्यावरील मांजरा नदीवरील पूल वाहून गेला आहे याची राज्य पातळी वरील विशेष पथकाकडून चौकशी करून अधिकारी व संबंधित एजन्सीवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. या वेळी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, भागवत नागरे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, राहुल नागरगोजे, अड.विशाल मस्के तसेच शिवसेना(उबाठा) पक्षाचे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवूळ, सचिव आकाश कांकरिया, अल्पसंख्याक सेल प्रमुख मुन्ना शेख, अजय डोरले हे उपस्थित होते. वरील मागण्या मान्य झाल्या नाहीत तर लवकरच सर्व पक्षीय तीव्र आंदोलनाचा ईशारा देखील देण्यात आला आहे.

## रेवदंडा पारनाका पावसातही भक्तिभावाची उधळण ; मारुती देवस्थानचा पालखी सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा पारनाका पंचक्रोशीतील भाविकांसाठी वर्षानुवर्षांची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री मारुती देवस्थानचा वार्षिक पालखी सोहळा बुधवारी मोठ्या भक्तिभावात आणि जल्लोषात पार पडला. पावसाळ्यातील रिमझिम सरी असूनही गावातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने घरोघरी हजेरी लावून परंपरेला सलाम ठोकला.

सकाळपासूनच गावाच्या मुख्य रस्त्यांवर रांगोळ्यांची उधळण, भगव्या झेंड्यांचे फडफडणारे निशाण, वादन पथकांचे सूर आणि टाळ–मृदंगाच्या निनादात "श्रीराम जय राम जय जय राम"चा अखंड गजर घुमत होता. गेले सात दिवस सुरू असलेल्या हरिनाम सप्ताहाचा आज या पालखी सोहळ्याने मंगलमय समारोप झाला. विशेष म्हणजे, मराठमोळी संस्कृती जपत महिला मंडळी नववारी साड्यांमध्ये, तर पुरुष मंडळी सदरा-लेंगा घालून मिरवणुकीत सहभागी झाले. मार्गक्रमणादरम्यान पालखी गावातील विविध भागातून गेली असता, जागोजागी गृहिणींनी आरत्या करून देवासमोर लहान-थोरांसह नतमस्तक होत आशीर्वाद घेतला. फुलांची उधळण, प्रसाद वाटप आणि पारंपरिक कोकणी पाहुणचाराने भाविकांचे स्वागत झाले.भजनी मंडळांच्या हरिनाम गजराने आणि बँड पथकांच्या सूरांनी सोहळ्याची शोभा अधिक खुलवली. मारुती देवाच्या चरणी भाविकांनी आपापल्या मनोकामना व्यक्त केल्या, गावाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. पावसाने या दिवशी विश्रांती घेतल्याने सोहळ्यातील आनंद आणि उत्साह द्विगुणित झाला. भक्ती, एकात्मता आणि कोकणातील सांस्कृतिक वैभवाचा संगम घडवणारा हा पालखी सोहळा पंचक्रोशीतील भाविकांच्या मनामनात कायमचा घर करून गेला.



# माणकेश्वर वाचनालय अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

महाराणी अहिल्याबाई होळकर यांची आज जयंती आहे. त्यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील चौंडी गावात झाला होता. अहिल्याबाईंना भारतीय इतिहासातील उत्कृष्ट महिला शासकांपैकी एक मानले जाते. ज्या काळात स्त्रियांना शाळेत जाण्याची परवानगी नव्हती, तेव्हा अहिल्याबाईंच्या वडिलांनी त्यांना लिहायला आणि वाचायला शिकवलं. अहिल्याबाई होळकर यांचा मृत्यू 13 ऑगस्ट 1795 रोजी झाला होता. अशा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना पुण्यतिथी दिवशी विनम्र अभिवादन...

अठराव्या शतकातील मराठी शाळेचा एक प्रमुख आधारस्तंभ असणाऱ्या इंदूरच्या होळकर रियासतीच्या शासक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी निमित्त माणकेश्वर वाचनालय




सभागृह येथे वाचनालयाचे संचालक बाळासाहेब कर्डिले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी 29 वर्ष राज्य कारभार करताना संपूर्ण देशभर मंदिरे, विहिरी, घाट ,धर्मशाळा, उभारली त्यांच्या कार्यकाळात त्यांनी व्यापार शेतीला प्राधान्य दिले या निमित्ताने आपण आपल्या इतिहास जाणून घेतला पाहिजे व अंगीकारला पाहिजे असे प्रतिपादन वाचनालयाचे संचालक सुनील चिखले साहेब यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, हिशोब तपासणी,दत्ता काका उगावकर, संचालक राजेंद्र खालकर,ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल आरती जंगम,लेखनिक नंदकुमार पुंड
शिपाई अनिता इस्ते आधी उपस्थित होते.

## इंद्रराज महाविद्यालयात ग्रंथपाल दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

:- सिल्लोड येथील इंद्रराज महाविद्यालय येथे दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन हिंदी विभागाचे विभागप्रमुख डॉ. पी एस पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी डॉ.पी एस पाटील यांनी आजचा विद्यार्थी मोबाईल मध्ये अधिक गुंतत चालला आहे त्यामुळे वाचनाकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वेळ ग्रंथालयात बसून वाचना करता द्यावा. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्ती मध्ये वाढ होते. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. सविता म्हस्के, प्रा.डॉ.सी.एम.काळे,प्रा. डॉ.जे.एस.अंभोरे,प्रा. डॉ.माधवसिंग इंगळे, प्रा.डॉ.बी एन.कावळे, प्रा. डी.बी.अग्रवाल, डॉ.महेश बाबरेकर,प्रा.डॉ.चंद्रकांत देवकाते, प्रा.डॉ.सुचिता देशमुख, श्री.किरण राजपूत, प्रा.देशमुख, प्रा.सोळंके,प्रा.मांडोरे तसेच ग्रंथालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## पनवेल शहर पोलीस ठाण्यात घेण्यात आली दहीहंडी उत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

आगामी दहीहंडी उत्सव निमीत्तानेपनवेल शहर पोलीस ठाणे येथे पोलीस ठाणे हद्दीतील आस्थाना व सार्वजनिक मंडळाचे प्रमुख पदाधिकारी यांची सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह विविध मंडळांचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी सांगितले कि, कार्यक्रम ठिकाणी सीसीटीव्ही लावणे व स्वयंसेवक यांची नेमणूक करावी, संबंधीत सर्व आस्थापनाची परवानगी विहीत वेळेत प्राप्त करणे, दहिहंडी उत्सवा दरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच इतर नागरीकांना त्रास होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेणे, दहिहंडी ठिकाणी गोविंदाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्याउपाययोजना करणे, दहिहंडी ठिकाणी प्रथमोउपचार पेटी, डॉक्टरांची टीम, अम्बुलन्स इत्यादी सोय करणे, कार्यक्रमा वेळी कोणत्याही जाती-धर्माच्या धार्मीक भावना दुखावल्या जातील असे आक्षेपार्ह गाणे, पोवडा, वाद्य, संगीत लावू नये तसेच आक्षेपार्ह भाष्य करू नये, ध्वनी प्रदुशण संदर्भात मा.न्यायालय यांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात यावी, सार्वजनिक दहीहंडी मंडळांनी दहीहंडी उत्सव ठिकाणे पार्किंगची व्यवस्था करावी, 14 वर्षाखालील गोविंदा नसावा, दहीहंडी उत्सव निमित्त भेट देणाऱ्या सलामी पथकाची नोंद रजिस्ट्री ठेवावे अश्या सूचना देण्यात आल्या.



# चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल ( स्वायत्त)

**येथे तीन दिवसीय युवा मानसरंग क्लब च्या वतीने कार्यशाळा- "मास्टरींग द पॉवर ऑफ पॉझिटीव्हीटी" हा कार्यक्रम संपन्न**

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल ( स्वायत्त) येथे दि. ०६ ऑगस्ट २०२५ ते ८ ऑगस्ट २०२५ रोजी "युवा मानसरंग क्लब च्या वतीने "मास्टरींग द पॉवर ऑफ पॉझिटीव्हीटी" हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. ह्या कार्यक्रमाची सुरुवात युवा मानास्त्रंग संवादक तर्फे आमंत्रित पाहुणे एम.डी. इन कम्युनीटी मेडिसिन डॉ. दीपक पाटील व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शुभांगी डेरे पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व समुपदेशन विभागाच्या प्रमुख सौ. स्वाती परब यांच्या स्वागताने झाली. मानसरंग संवादक श्रेया, प्रज्ञा, सिद्धी यांनी हि जबाबदारी पार पडली.

ह्या तीन दिवसीय कार्यशाळेची सुरवात प्रमुख पाहुणे डॉ. दीपक पाटील यांनी 'आम्ही सकारात्मकतेने कनेक्ट होत आहोत' ह्या विषयाने केली. ह्यामध्ये निरीक्षण कौशल्य, गैर-न्यायिक वृत्ती तसेच आपण कोल्हा बनून प्रतिक्रिया द्यायची की जिराफ बनून शांत राहून प्रश्न सोडवायचा असे त्यांनी सांगितले. दुसऱ्या व तिसर्या दीवशी प्रो. डॉक्टर शुभांगी डेरे -पाटील यांनी "जीवनात येणारे तणाव (बौन्सिंग बॅक टू लईफ)" हाताळायचे बरेच कौशल्य जसे 'पर्मा मॉडेल, मेडीटेशन कौशल्य, आधारभूत कौशल्य, गोल सेटिंग, वेळेचे प्रभावी नियोजन' शिकवण्यात आले.त्याचबरोबर कार्यशाळेच्या तिसर्या दिवशी "पॉझिटीव्ह मी" या सत्रामध्ये शेवटी चार लाइव केसेस – चार गटांना देण्यात आलया व त्यांना ह्या तीन दिवसात शिकलेली कौशल्य व युक्त्या तुम्ही वापरून ह्यामधून काय सोल्युशन काढणार हे सादरीकरण करावयास सांगितले. या कार्यशाळे मार्फत जीवन जगण्यास उपयुक कैशाल्ये शिकण्यास मिळाली असा प्रतिसाद विद्यार्थ्यांन कडून मिळाला.

या कार्यक्रमासाठी बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रा.डॉ. भाग्यश्री भोईर, फॅशन आणि डिझायनिंग विभागाच्या प्रा. सुचित्रा गवळे , इंटेरिअर डिझायनिंग विभागाच्या ए. आर. प्रज्योती देसाई, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. सोनाली हुद्दार, बॅचलर अकाउंटिंग ऑफ फायनान्स प्रा. करण कोळी , संगणक विज्ञान विभागाच्या प्रा. भाग्यश्री दामले , फॅशन आणि डिझायनिंग विभागाच्या विभागप्रमुख प्रा.दीपश्री राठोड, इंटेरिअर डिझायनिंग विभागाच्या प्रा. स्वेच्छा गोसावी व ७३ विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सांगता मानास्त्रंग संवादक -विद्यार्थी वर्ग सदफ, निशा, हर्ष आणि प्रज्ञा यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे ही संधी दिल्याबद्दल आभार मानत केली तसेच समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

## क्रीडा सह्याद्रीचा खेळाडू प्रज्वल गाजरे याची राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



निफाड /-टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित जिल्हास्तरीय 17 वर्षे आतील अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी नाशिक येथील दत्ता मोगरे स्टेडियम येथे उत्साह संपन्न झाली त्यामध्ये क्रीडा सह्याद्री क्लबच्या खेळाडूंनी सहभाग नोंदवून द्वितीय क्रमांक मिळवला

त्यामध्ये प्रज्वल गाजरे याने उत्कृष्ट खेळ करत त्याची राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली व त्याचे जिल्ह्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे..

प्रज्वल गाजरे हा दोन वर्षापासून क्रीडा सह्याद्री
क्लब मध्ये प्रॅक्टिस करत आहे त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी बॉलर म्हणून निवड झालेली आहे

प्रज्वल गाजरे याची राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड सदस्य क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे ,सदस्य विनोद गायकवाड, चेतन कुंदे,दत्तू रायते ,रमेश वडघुले ,प्रतीक्षा कोटकर, अनिता बनकर,विजय घोटेकर , कीर्ती कोटकर, श्याम चौधरी, लखन घटमाळे यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा द्या..

क्रिडा मार्गदर्शक विलास गायकवाड यांचे त्याला मार्गदर्शन लावत आहे

# आता दिवसा वीज वापरा अन् बिलात सवलत मिळवा!

दैनिक युवक आधार
सतीश कडू नागपूर विभाग प्रतिनिधी

नागपूर, दि. 13 ऑगस्ट 2025: वीज वितरण प्रणालीच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत महावितरणने जिल्ह्यात आतापर्यंत 2.78 लाखांहून अधिक तर वर्धा जिल्ह्यात 46 हजारावर स्मार्ट 'टाईम ऑफ डे' (TOD) मीटर यशस्वीरित्या बसवून कार्यान्वित केले आहेत. विशेष म्हणजे, आजवर केवळ औद्योगिक ग्राहकांना मर्यादित असलेली 'टाईम ऑफ डे' वीजदर सवलत 1 जुलैपासून घरगुती ग्राहकांनाही लागू झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्राहकांना त्यांच्या वीज बिलात लक्षणीय बचत करण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.

राज्य वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार, ज्यांच्याकडे टीओडी मीटर आहे त्यांना सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत वापरलेल्या विजेवर विशेष सवलत मिळेल. ही सवलत टप्प्याटप्प्याने वाढत जाणार आहे, यात सध्या प्रति युनिट 80 पैसे सवलत असून 2029-30 पर्यंत प्रति युनिट 1 रुपयापर्यंत ही सवलत टप्प्याट्प्प्याने वाढणार आहे. यामुळे वीज ग्राहकांनी त्यांच्याकडील वॉशिंग मशीन, गीझर, एअर कंडिशनर (AC) यांसारखी जास्त वीज वापरणारी उपकरणं सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत वापरल्यास त्यांच्या बिलात मोठी बचत होणार अहे.

याशिवाय, टीओडी मीटर वीज वापराची नोंद वेळेनुसार अचूकपणे करीत असल्याने बिलातील चुका टाळता येतात. मोबाईल अपवर ग्राहक त्यांचा वीज वापर कधी आणि किती होतो हे पाहू शकता. यामुळे गरजेनुसार वापर नियोजित करू शकतात. कोणत्या वेळेत वीज स्वस्त आहे हे माहीत असल्यामुळे ग्राहक अधिक जागरूकपणे वीज वापर करुन ऊर्जेची बचत करु शकतात. महावितरण हे मीटर पूर्णपणे मोफत बसवून देत आहे. तसेच, हे मीटर प्रीपेड नसून पोस्टपेड असल्यामुळे रिचार्ज करण्याची किंवा अचानक वीज खंडित होण्याची चिंता नाही.

**ग्राहकांचा प्रतिसाद**

नागपूर जिल्ह्यात आजवर 2 लाख 78 हजार 146 ग्राहकांकडे तर वर्धा जिल्ह्यात 46 हजार 5 ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. यात नवीन वीजजोडणी, सोलार नेट मीटरिंग आणि नादुरुस्त वीज मीटर बदलून त्याठिकाणी स्मार्ट मीटर बसविल्याचा समावेश अहे.

**अफवांवर विश्वास ठेवू नका!**

स्मार्ट मीटरमुळे बिल जास्त येत नाही. उलट, टीओडी मीटरमुळे ग्राहक वीज वापर योग्यप्रकारे नियोजित करून बचत करू शकता. हे मीटर बसवण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. याशिवाय, यातून निघणारे रेडिएशन मोबाईल फोनपेक्षा खूप कमी असल्याने हे मीटर आरोग्यासाठी हानिकारक नाहीत.

महावितरणच्या सर्व ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घ्यावेत आणि या आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा. हे मीटर ऊर्जा व्यवस्थापनात क्रांती घडवतील सोबतच वीज चोरीला आळा घालून वितरण गळती कमी करण्यास मदत करतील. स्मार्ट मीटर हे वीज वितरण प्रणालीला आधुनिक आणि कार्यक्षम बनवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या तंत्रज्ञानाचा पुरेपूर फायदा घेऊन ग्राहक आपले वीज बिल कमी करू शकतात, त्यामुळे कुठल्याही अफ़वांना बळी न पडता वीज ग्राहकांनी टीओडी मीटर बसविण्याच्या कामी महावितरण आणि संबंधित एजन्सीला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**महावितरण, नागपूर**

## नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी रत्नमाला कापसे यांचा अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी शिवसेनेच्या रत्नमाला संपतराव कापसे यांचा एकमेव अर्ज दाखल १९ तारखेला होणाऱ्या निवडीच्या निवडीसाठी फक्त औपचारिकता बाकी आहे नगरपंचायत मुख्य अधिकारी धीरज भामरे यांच्याकडे अर्ज सादर केला त्यावेळी राजाभाऊ शेलार , राजेभाऊ राठी, उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे नगरसेविका कविता धारराव, सुलोचना होळकर, कांताबाई कर्डिले, विमलताई जाधव, किशोर ढेपले ,संदीप जेऊघाले साहेबराव बर्डे, नंदू भाऊ कापसे, मुकुंद राजे होळकर ,आसिफ भाई पठाण, संदीप बंटी शिंदे, मोहन जाधव, सोमनाथ निकम, देवदत्त कापसे नाना कर्डिले आदी मान्यवर उपस्थित होते.



निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करताना रत्नमाला कापसे आणि पदाधिकारी

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# प्रजापिता ब्रम्हाकुमारी तर्फे महारत्तदान शिबिर;

## ग्रीनिच वर्ल्ड रेकॉर्ड करणार !

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी




संस्थेच्या पुर्व मुख्य प्रशासिकादादी प्रकाशमणीजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त व विश्व बंधुत्वदिनाचे औचित्य साधून प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातील समाज सेवा विभाग व लायन्स क्लब अलिबाग यांचे विद्यमाने बुधवार दिनांक 20 ऑगस्ट रोजी सकाळी 9 ते 2वाजे पर्यंत लायन्स क्लब हॉल ब्राह्मण आळी अलिबाग येथे आयोजित करण्यात आले आहे.या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी रायगड किसन जावळे यांचे शुभहस्ते होणार आहे.हे रक्त दान शिबिर संपुर्ण भारतात,नेपाळ मधे सकाच वेळी होणार असून देशभरातील रुग्णालयात रक्ताची कमतरतेमुळे सामाजिक बांधिलकीतून आयोजन करण्यात येत असून रक्त दात्याने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. चला भाग्य बनवू स्वतासोबत ईतरांचे जीवन सुंदर बनउया ओम शांती असा संदेशदेत अलिबाग केंद्र प्रमुख भारती दिदी यांनी सदरची माहितीआमच्या प्रतिनिधीला दिली असून आपली नोंदणी केंद्रातील मो. 9604776684 येथे करावी.असे आव्हान प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातीलअलिबागयांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय समारोह मुंबईत

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन समारंभ शुक्रवार दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी साजरा करण्यात येणार आहे. राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालय मुंबई येथे सकाळी 9.05 वाजता ध्वजारोहण करून साजरा करण्यात येईल. पुणे येथे राज्यपाल यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. तर राज्यामधील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी पुढील मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात यावे, असे सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

परिपत्रकाद्वारे जिल्हा आणि ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत ठाणे- एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे,



बीड- अजित आशाताई अनंतराव पवार, नागपूर- चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर- राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे - पाटील, गोंदिया- छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ, सांगली- चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील, नाशिक- गिरीश गीता दत्तात्रय महाजन, पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, अमरावती- दादाजी रेश्माबाई दगडू भुसे, यवतमाळ- संजय प्रमिला दुलिचंद राठोड, रत्नागिरी- उदय स्वरुपा रवींद्र सामंत, धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना- श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड- अतुल लिलावती मोरेश्वर सावे, चंद्रपूर- डॉ.अशोक जनाबाई रामाजी वुईके, सातारा- शंभुराज विजयादेवी शिवाजीराव देसाई, मुंबई उपनगर- अड.आशिष मिनल बाबाजी शेलार, वाशिम- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे, रायगड- कु.आदिती वरदा सुनिल तटकरे, लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले, नंदुरबार- अड.माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे, सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ, भंडारा- संजय सुशिला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर- संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग- नितेश निलम नारायण राणे, अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, कोल्हापूर- प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर, गडचिरोली- अड.आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल, वर्धा- डॉ. पंकज कांचन राजेश भोयर आणि परभणी- श्रीमती मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर.

राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमासाठी पालकमंत्री निश्चिती झाली नसल्यास किंवा निश्चित झालेले पालकमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्त आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी हे ध्वजारोहण करतील. विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन येथील ध्वजारोहण विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या हस्ते करण्यात यावे, असेही राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# पनवेल तालुका पोलीस ठाण्यात मच्छिमार बांधव यांचा वैदयकीय कॅम्प व बैठक संपन्न

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

पनवेल तालुका पोलीस ठाणे वतीने केळवणे ग्रामपंचायत येथे मच्छिमार बांधव यांच्या करिता शुश्रुषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या मदतीने डॉक्टर श्री आदिल शेख, कॅम्प व्यवस्थापक रत्नमाला पाबरेकर , प्रदीप विगोपाळ, साक्षी पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य शिबीरामध्ये मच्छिमार बांधव व कुटुंबातील सदस्य यांच्या करिता एसपीओ टू, ब्लड प्रेशर, शुगर व ईसीजी या वैद्यकीय तपासणी करण्यात आला तसेच तज्ञ डॉक्टरांकडून त्यांना आरोग्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराचा केळवणे गावातील 30 मच्छिमार बांधवयांनी लाभ घेतला. सदर वैदयकीय कॅम्प समाप्त झाल्यानंतर वपोनि गजानन घाडगे यांनी सागरी सुरक्षे अनुषंगाने बैठक घेऊन योग्य त्या सूचना देऊन डायल 112, व पोलीस बतावणी बाबत जनजागृती केली. तसेच कोस्टल फी हेल्पलाईन कमांक 1093 ची माहिती देण्यात आली आहे.






# डहाणू येथे रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सव

## स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ व रोजगाराला चालना मिळणार

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी



आदिवासी विकास विभागाच्या निर्देशानुसार, राज्यातील आदिवासी भागांमध्ये रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सवांचे आयोजन सुरू करण्यात आले असून, या उपक्रमाचा उद्देश म्हणजे आदिवासी भागातील रानभाज्या, रानफळे, वनौषधी व अन्नधान्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे.

या उपक्रमाअंतर्गत, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक महिलांच्या सहभागातून रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सव डहाणू तालुक्यातील पारनाका पळसपाडा येथे उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात डहाणू, तलासरी, पालघर व वसई तालुक्यातील सुमारे 34 बचत गटांनी सहभाग घेतलाहोता

. प्रत्येक बचत गटाने विक्रीसाठी रानभाज्या व हंगामी भाजीपाला मांडला होता. यामध्ये माठ, अंबाडी, उडदाची डाळ, खुरसानी, अळू, शेवगा, कुर्डू, डाळीबाजी, वास्ता, भेंडी, कंटोली, पेंढरे, अभयच्या शेंगा, दुधी अशा अनेक भाज्यांचा समावेश होता. शहरी भागातील नागरिकांना रानभाज्यांची ओळख करून देत त्यांच्या पौष्टिकतेबाबत महिलांनी माहिती दिली. तसेच या भाज्यांपासून बनवलेल्या पदार्था ठेवण्यात आले होते, ज्यांचा आस्वाद घेऊन उपस्थितांनी चवीची दाद दिली. महोत्सवामुळे नैसर्गिकरीत्या जंगलात उपलब्ध असलेल्या रानभाज्या, कंदमुळे, फळे व फुलभाज्या डहाणूकरांना एका ठिकाणी पाहण्याची व खरेदी करण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व महिला बचत गटांच्या अध्यक्षांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून झाले. प्रकल्प अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमास सहाय्यक प्रकल्प अधिकारी



बन्सीलाल पाटील, उमेदचे समन्वय अधिकारी प्रभुदास गावित, सुनील वाघ, आदी मान्यवर उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. हा उपक्रम स्थानिकांना उत्पन्नाचे साधन व पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# वृक्षाचे जतन केले तर पर्यावरणाचा समतोल राहणार आहे :- शिवाजीराव निंबाळकर

दैनिक युवक आधार
सणसर :- विकास क्षत्रिय

श्री छत्रपती हायस्कूल सणसर येथे नितीन नाना निंबाळकर यांच्या परिवारामार्फत नर्मदा वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती कारखाना संचालक रामचंद्र सर निंबाळकर व शिवाजीराव निंबाळकर उपस्थित होते.या कार्यक्रमाप्रसंगी प्रथम वृक्षाला राखी बांधून सुरवात करण्यात



आली.पर्यावरणाची काळजी घेणे ही काळाची गरज असून ग्रामीण भागातील नागरिकांनी गरज ओळखून वृक्षाचे जतन करावे असे मत श्री छत्रपती कारखाना संचालक शिवाजीराव निंबाळकर यांनी केले.यावेळी हायस्कूलमधील विध्यार्थीनी यांनी विध्यार्थी यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले नंतर नर्मदा वृक्षारोपण उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.यावेळी हायस्कूल परिसरात देशी वृक्षाचे वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री छत्रपती कारखाना संचालक रामचंद्र सर निंबाळकर शिवाजीराव निंबाळकर माजी संचालक संभाजी निंबाळकर सणसचे सरपंच यशवंत पाटील माजी सरपंच पार्थ निंबाळकर युवा नेते विशाल निंबाळकर माजी चेअरमन सुधीर निंबाळकर सुनील माने किरण गायकवाड उपजिल्हाप्रमुख कुलदीप निंबाळकर वैद्यकीय तालुका प्रमुख सुनील निंबाळकर यात्रा कमिटीचे माजीअध्यक्ष नितीन नाना निंबाळकर युवा नेते शंभूराज निंबाळकर भानुदास निंबाळकर नंदकुमार निंबाळकर अनिरुद्ध कदम बाळासाहेब नलवडे विक्रमभैय्या निंबाळकर ग्रामसेवक सचिन पवार मुख्याध्यापक चव्हाण सर भोसले सर यादव सर घाडगे सर भोईटे सर विकास फुले यशवंत चव्हाण शाम गायकवाड व सर्व शिक्षक शिक्षिका विध्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमोडे सर यांनी करून नर्मदा वृक्षारोपण कार्यक्रम केल्याबद्दल नितीन नाना निंबाळकर व परिवार यांचे आभार व्यक्त केले.

# नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सने केला अवयवदात्या कुटुंबियांचा सन्मान

## जागरूकता सत्राच्या माध्यमातून पटवून दिले अवयव दानाचे महत्त्व

दैनिक युवक आधार
*नवी मुंबई: प्रतिनिधी

जागतिक अवयवदान दिनानिमित्त अवयवदान करणाऱ्या व्यक्तींच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करत नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सने अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना यावेळी सन्मानित केले. आपल्या प्रिय व्यक्तीचे अवयव दान करून गरजुंना नवे आयुष्य देणाऱ्या कुटुंबीयांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि इतरांना त्यांच्या कार्याचे अनुसरण करण्यास प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश होता.

रुग्णालयाने अवयवदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी आणि त्याबाबत असलेले गैरसमज करण्यासाठी डॉक्टर, प्रत्यारोपण समन्वयक आणि दात्या कुटुंबियांच्या उपस्थित जनजागृती व्याख्यान आणि संवादात्मक सत्राचे आयोजित केली होते.

*या ठिकाणी आयोजित चर्चा सत्रातत डॉ.



सनिश श्रृंगारपुरे, डॉ. विकास भिसे, डॉ. अमित नागरीक, डॉ. अमर कुलकर्णी, डॉ. रावसाहेब राठोड, डॉ. दीपक अहिरे आणि डॉ. अदिती जैन यांचा समावेश होता.*

मेडिकव्हर हॉस्पिटल्स हे विविध कार्यक्रमांद्वारे अवयवदानाविषयी जागरूकता वाढवत आहे. हा कार्यक्रम केवळ कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच नाही तर इतरांना अवयवदानाबाबत प्रेरणा देणारा होता. जगण्याची दुसरी संधी देणाऱ्या या दात्यांचे स्मरण करून, आम्ही या निस्वार्थ कार्यात सामील होण्यासाठी आम्ही नागरिकांना आवाहन करतो *अशी प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी स्पष्ट केले.*

*दाता कुटुंबातील सदस्य समीर पाटील सांगतात की,* आपल्या प्रिय व्यक्तीला गमावणे हे खरोखरच मन हेलावणारे असते, परंतु त्यांच्या अवयवांनी इतरांना नवीन जीवन दिले हे जाणून आपल्याला त्यांना कायमस्वरूपी स्मरणात ठेवता येते. आमच्या योगदानाची दखल घेणाऱ्या तसेच नागरिकांना अवयव दानाचे महत्त्व पटवून देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित केल्याबद्दल आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे विशेष आभार मानतो. यामुळे आम्हाला असे वाटते की आपल्या प्रिय व्यक्तीचा वारसा हा त्यांनी प्राप्तकर्त्यांच्या माध्यमातून कायमजिवंत राहील. यावेळी उपस्थिताना अवयवदानासाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

# राजीव गांधी महाविद्यालयाला तीन सुवर्णपदकांसह जनरल चॅम्पियनशिप

दैनिक युवक आधार
मुदखेड




, दि. 13 ऑगस्ट – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतरमहाविद्यालयीन क-झोन कुस्ती स्पर्धा विद्यापीठाच्या इंडोर हॉलमध्ये उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत 12 महाविद्यालयांचे एकूण 32 कुस्तीपटू सहभागी झाले. अटीतटीच्या लढतींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड यांनी तीन सुवर्ण व एक रौप्य पदक मिळवून सर्वसाधारण चॅम्पियनशिपचा मान पटकावला.

**विजेतेपद मिळवणाऱ्या खेळाडूंमध्ये** –

57 किलो वजन गट : गणेश संतोष माचनवाढ – सुवर्णपदक

74 किलो वजन गट : अभिनव केशव शिंदे – सुवर्णपदक

79 किलो वजन गट : मन्मथ शिवराज मुंगडे – सुवर्णपदक

74 किलो वजन गट : अवधूत आत्माजी राहेर – रौप्य पदक

स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे महाविद्यालयातील चारही विजेते खेळाडू सेंट्रल झोन कुस्ती स्पर्धेसाठी निवड व सराव शिबिरासाठी पात्र ठरले.

बक्षीस वितरण सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव मान. श्री. डी. पी. सावंत, सहसचिव रावसाहेबजी शेंदारकर, कोषाध्यक्ष अॅड. उदयरावजी निंबाळकर, कार्यकारिणी सदस्य श्री. नरेंद्र दादा चव्हाण यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

खेळाडूंना क्रीडा विभागाचे डॉ. अर्जुनसिंग ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रभारी क्रीडा संचालक प्रा. प्रकाश कोथळे व डॉ. आर. एस. कोंडेकर यांनीही विशेष सहकार्य केले.

# सायखेडा मार्केट यार्ड परिसरातून ट्रकमधून डिझेल चोरी करणारा आंतर जिल्ह्यातील गुन्हेगार अटक

## नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
**विंचूरः**
दि.१३ ऑगस्ट २०२५ :- दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात आरोपींनी सायखेडा मार्केट यार्ड परिसरात उभ्या असलेल्या दोन मालट्रकांच्या डिझेल टँक मधून ३८,६८८ रुपये किंमतीचे ४२५ लिटर डिझेल लबाडीच्या इराद्याने चोरून नेले होते. सदर प्रकरणी सायखेडा पोलीस ठाण्यात गुरनं १४३/२०२५ भा.न्या. सं. कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



वरील गुन्ह्याच्या समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अहमदनगर जिल्ह्यातील राहाता येथील डिझेल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांनी सदरचा गुन्हा केल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार स्थागुशाच्या पथकाने राहाता तालुका परिसरातून गुन्हेगार प्रसाद दत्तात्रय वाडेकर (वय २१, रा. रांजणगाव खुर्द, गणेशनगर, ता. राहाता, जि. अहमदनगर) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने साथीदार अमोल कुंदे (रा. एकरूखे, ता. राहाता) व अजय भोसले (रा. शिर्डी, ता. राहाता) यांच्यासह इनोव्हा व इर्टिगा कारमधून सायखेडा कांदा मार्केट परिसरात येऊन उभ्या असलेल्या ट्रकांमधून डिझेल चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेले डिझेल विकून त्यातील आलेले पैसे आरोपींनी आपापसात वाटून घेतल्याचेही निष्पन्न झाले.

आरोपी प्रसाद वाडेकर याच्या कब्जातून गुन्ह्यात वापरलेली सफेद रंगाची इनोव्हा कार (क्रमांक एमएच ०४ डीजे ४१११) व रोख १२,६०० रुपये असा एकूण ७,१२,६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. प्रसाद वाडेकर याच्यावर यापूर्वी मनमाड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल असून, फरार आरोपी अजय भोसले व अमोल कुंदे यांच्यावर यापूर्वी अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक जिल्ह्यात डिझेल चोरीचे गुन्हे दाखल आहेत. यापूर्वीही या आरोपींनी मुंबई-आग्रा हायवेवरील दहावा मैल परिसर, सायखेडा व सिन्नर-शिर्डी महामार्गावर रात्रीच्या वेळी उभ्या असलेल्या ट्रकांमधून डिझेल चोरी केल्याचे सांगितले असून, आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर, पोउनि सुदर्शन बोडके, सपोउनि नवनाथ सानप, पोलीस अंमलदार विनोद टिळे, सतीश घुटे, हेमंत गरूड, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम, नितीन गांगुर्डे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# श्री. ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
"श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४५ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात सादर झालेल्या संगीत सभेत ठाणे येथील युवा गायिका सानिका राजवाडे-नातू यांनी आपली संगीत सेवा सादर केली. विदुषी अपूर्वा गोखले यांच्या शिष्या असलेल्या
सानिका राजवाडे यांनी संगीत सभेच्या सुरुवातीला पुरिया रागातील बंदिश सादर केली.

त्यानंतर राग मारू बिहाग मध्ये छोटा ख्यालातील एक तराणा सादर केला. नंतर त्यांनी ओंकार प्रधान, सुंदर ते ध्यान, अमृताहुनी गोड या अभंगांचे सादरीकरण केले. त्यानंतर कबिराचे विणतो शेले, सुखाचे जे सुख, पद्मनाभा नारायणा हे अभंग सादर केले. नंतर उगवला चंद्र पुनवेचा हे नाट्यगीत व सगुण निर्गुण हे भजन सादर केले. हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा या गजराने त्यानी संगीत सभेची सांगता केली. रत्नागिरी येथील युवा तबला वादक अमेय भडसावळे याने तबलासाथ, सोहम जोशी यांनी संवादिनीसाथ आणि चैतन्य कोशे यानी तालवाद्य साथ केली. समीर सोमण यांनी बहारदार निवेदन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मठातील कार्यकर्ते व मासिक संगीत सभेचे आयोजक यांनी मोलाचे योगदान दिले. पनवेल परिसरातील जाणकार रसिक श्रोत्यांची या संगीत सभेला मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# पोलिसांनी अडीच लाखांचे 19 मोबाईल नागरिकांना केले परत

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेल तालुका पोलिसांनी दोन लाख 66 हजार रुपयांचे 19 मोबाईल यशस्वीरिता हस्तगत करून मालकांना परत केले आहेत.

पनवेल परिसरात मोबाईल चोरीची आणि गहाळ झालेल्या तक्रारीत वाढ होत आहे. चोरीला किंवा हरवलेले मोबाईल फोन बाबतची तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना भारत सरकार द्वारे सी ई आय आर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनी गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी विविध राज्यातून 19 मोबाईल हस्तगत केले. यापूर्वी या पोर्टल द्वारे 77 मोबाईल 9 लाख 24 हजार रुपये किमतीचे मूळ मालकांना परत करण्यात आले. यावेळी नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले. (फोटो)

# तक्का गाव परिसरात गाड्यांचे सायलेन्सर गेले चोरीला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेल शहरातील तक्का गाव परिसरात गाड्यांचे सायलेन्सर चोरीला जाण्याचे प्रकार वाढत असल्याने वाहन मालक त्रस्त झाले आहेत. येथील चोरांना अटक करण्याची मागणी केली जात आहे. तक्का येथून तिन जणांच्या गाड्यांचे सायलेन्सर चोरीला गेले आहेत. सायलेन्सर चोरी करणारे चोरटे सीसी टीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहेत. या बाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# ट्रकमधील लाखो रुपये किमतीचा माल चोरणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेल जवळील मुंबई एक्सप्रेस वर ब्रिजच्या अलीकडे ट्रक चालक झोपला असताना चोरट्याने ट्रकमधील लाखो रुपये किमतीचा माल चोरुन नेला होता. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे. चोरीचा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी झायेद मुस्तफा फारुकी (वय 19) व कैस मुस्तफा राईन (वय 19 वर्षं दोन्ही राहणार - तुर्भे स्टोअर झोपडपट्टी) याना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून चोरीचा २ लाख ८२ हजार रुपये किमतीचा माल हस्तगत करण्यात आला.

# मानव सेवा प्रतिष्ठानचा अनोखा उपक्रम मुंबईतील ताज हॉटेल मध्ये नेऊन केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**
दि.१४,शिळ(ठाणे):- शिळ गावातील मानव सेवा प्रतिष्ठान तर्फे दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना ताज हॉटेलमध्ये मेजवानी हा उपक्रम राबवण्यात आला त्यानुसार रविवार दि.१०ऑगस्ट रोजी मानव सेवा प्रतिष्ठान च्या पदाधिकाऱ्यांकडून शिळ, देसाई, डायघर विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना मुंबई येथील ताज हॉटेलमध्ये नेऊन मेजवानी तसेच पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी मानव सेवा प्रतिष्ठानचे आभार मानत यामुळे आमचे आणि आमच्या नंतरच्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढेल असे सांगितले मानव सेवा प्रतिष्ठान नियमित समाजाला आदर्श आणि युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल असे उपक्रम राबवित असते मानव सेवा प्रतिष्ठानच्या 'गुणवंत विद्यार्थ्यांना ताज हॉटेलमध्ये मेजवानी' या उपक्रमाचा विद्यार्थ्यांचे पालक तसेच आजूबाजूच्या गावातील सर्व नागरिकांनी कौतुक केले आहे. या विभागातील शाळांमधील शिक्षक सुद्धा या उपक्रमाचं कौतुक करीत आहेत. आणि सध्या दहावी-बारावीला असलेल्या विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा उदाहरण देऊन त्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवीत आहेत.



# फुंडे कॉलेजमध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**
भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांचा जन्मदिवस दि. १२ ऑगस्ट संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर ए.एस. सी. कॉलेज फुंडे येथे राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.
ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर पुस्तक प्रदर्शनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचावीत असे पुस्तके प्रदर्शित करण्यात आली होती. पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योजक मा. श्री.मिलिंद पाटील यांनी केले. याप्रसंगी मिलिंद पाटील यांचे स्वागत गुलाब पुष्प आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनवलेले बुकमार्क देऊन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी केले. "शालेय जीवनात ज्याने ग्रंथालयाचा वापर केला आहे त्यालाच ग्रंथांचे खरे महत्त्व कळते. या प्रदर्शनात मांडलेली सगळीच पुस्तके महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचावीत आणि त्यातून प्रेरणा घ्यावी अशी आहेत." असे मत श्री. मिलिंद पाटील यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी देखील याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. संतोष देसाई व प्रा. तन्वी कोळी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटनाचे प्रास्ताविक आणि आभार महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी मानले.
या पुस्तक प्रदर्शनाच्या आयोजनामध्ये ग्रंथालय विभागातील सहायक श्री. कमल बंगारे व सौ.नर्मदा खरपडे यांनी परिश्रम घेतले.दिवसभरात महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी पुस्तक प्रदर्शनास भेट देऊन पुस्तक प्रदर्शन यशस्वी केले.



# .. शिवसेना सोशल मीडिया विभाग प्रमुख महादेव पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप..

**दैनिक युवक आधार -**
**संतोष पुदाले संपर्क - तुळजापूर धाराशिव**
तुळजापूर तालुक शिवसेना सोशल मीडिया विभाग प्रमुख महादेव पवार यांचे वाढदिवस येडशी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुकबधीर निवासी येथे सालाबादप्रमाणे मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व खाऊ वाटप करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी तुळजापूर शिवसेना शहर संघटक अर्जुन (आप्पा) साळुंखे शिवसेना सोशल मीडिया तालुका प्रमुख चेतन बंडगर शिवसैनिक अजित पवार अनिल गलांडे आकाश चौधरी व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते व तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.किरण मुदगन सर व शाळेतील शिक्षक श्री आबासाहेब नागरगोजे विकास रोचकरी सिद्धेश्वर खंदारे महादेव नारकर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते



# तहसील कार्यालय परिसरातील भामटेगिरीला चाप बसवा

## उद्धव बाळासाहेब ठाकरे (शिवसेना) आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**
**राळेगाव** : तहसील कार्यालयात व परिसरात काही भामटे दलाल गाव खेड्यातून तहसील कार्यालयात येणाऱ्या गोरगरीब अशिक्षित नागरिकांना हेरून व तहसीलचे कामे करून देतो असे बतावणी करून त्या गोरगरीब अशिक्षित नागरिकांना आर्थिक लूटमार करण्याचे प्रकार तहसील कार्यालयात व परिसरात घडत आहे.या घटनांना आळा बसविण्यात यावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनामार्फत शिवसेनेकडून विद्यमान तहसीलदारांना देण्यात आला निवेदन देतेवेळी उपजिल्हा प्रमुख विनोद काकडे,तालुका प्रमुख विजय पाटील, शंकर गायधने,उपता प्रशांत वार्हेकर,शहर महिला आघाडीच्या प्रमुख पार्वताबाई मुखरे,योगेश मलोंडे, अंकुश गेडाम,सुनील क्षीरसागर, श्रीकांत कोदाने,मडावी, येवती धनराजजी श्रीरामे, सुनील सावरकर, महेंद्र तुमाने, रोशन इरपाते, हिमांशू कोहळे, शंतनु श्रीराम सहारे, इत्यादी शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. शिधापत्रिकेचे नूतनीकरण व अधिवास प्रमाणपत्र काढून देतो म्हणून एका भामट्याने ३०० रुपये घेतले व कार्यालयातून पसार झाला. त्या गरीब कमी शिकलेल्या महिलेने दिवसभर त्या भामट्याची वाट पाहिली परंतु तो आला नाही या घटनेची रीतसर तक्रार महिलेने तहसील कार्यालयाला दिली आहे. दलालांवर ताबडतोब कार्यवाही करावी अन्यथा शिवसेना आंदोलन करणार असे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले निवेदनावर संतोष रामभाऊ मेश्राम लोभेश राऊत राजू किन्हेकार सुरेश चाफेकर हिमांशू कोहळे रवींद्र मेश्राम निलेश जुनगरे वैभव दुधे वसंत कोदाने संतोष होले संदीप ढगले शंकर ऊईके मनोज शिंदे नामदेव शेलवटे दीपक केवटे झाडगाव कवडूजी भोयर शेळी महादेव लाभाडे राहुल शिंदे धनराज चामलाटे इत्यादींच्या स्वाक्षरी आहेत.



# मंदिरातील 'नागोबा' चोरटे जेरबंद

## १२ तासांत चोरी उकल १००% मुद्देमाल हस्तगत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**
वडकीः-पोलीस स्टेशन हद्दीतील ग्राम खैरी येथील नागोबाच्या मंदिरातील लाकडी देवपाटावर ठेवलेल्या चांदी, तांबे व पितळाच्या एकूण २७-२८ छोट्या मूर्ती अज्ञात व्यक्तींनी चोरून नेल्या होत्या. या प्रकरणी श्री. हरिहर विठ्ठलराव हरबडे (वय ६०, रा. खैरी) यांच्या फिर्यादीवरून ११ ऑगस्ट २०२५ रोजी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.तपासा दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन स्थानिकांकडून माहिती घेतली. मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयित दिसून आले. त्यांची ओळख पटवून शोध घेण्यात आला व त्यांना अटक करण्यात आली. अटक आरोपींमध्ये १) संजय अजाबराव कोकाटे (वय ५५, रा. माता मंदिर वार्ड, हिंगणघाट, जि. वर्धा) २) दीपक भीमराव शेंडे (वय ३७, रा. नवीन वस्ती, राळेगाव) विचारपूस केल्यानंतर दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली व १००% मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात आला. ही कारवाई मा. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक श्री.अशोक थोरात, सहा. पोलीस अधीक्षक श्री.रॉबिन बन्सल (उपविभाग पांढरकवडा) यांच्या मार्गदर्शनाखाली,वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार एपीआय सुखदेव भोरकडे,एचसी अमोल चौधरी,निलेश वाढई,दीपक वाड्रसवार,एनपीसी सचिन नेवारे, पीसी विनोद मोतेराव,पीसी आकाश कुदुसे व पीसी अमीर किनाके यांनी केली.

# लेख बॉक्स मध्ये घ्या उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम

उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम (ULLAS NAV BHARAT LITERACY PROGRAMME) हा भारत सरकारद्वारे सुरू करण्यात आलेला प्रमुख शिक्षण अभियान आहे ज्याचे उद्दिष्ट १५ वर्ष व अधिक वयोगटातील असाक्षरांना बुनियादी साक्षरता, गुणाकार, आणि जीवन कौशल्ये देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**
हा कार्यक्रम राष्ट्रीय शिक्षा नीति-२०२० च्या प्रस्तावानुसार आर्थिक वर्ष २०२२-२७ मध्ये राबविण्यात येत आहे.
यात असाक्षरांसोबतच महिलांवर, अनुसूचित जातींवर आणि अल्पसंख्य समुदायांवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले आहे.

**कार्यक्रम रचना आणि उद्दिष्टे**
उल्लास कार्यक्रमातील मुख्य घटकः
बुनियादी साक्षरता व संख्यामिती
महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये
व्यावसायिक कौशल्य विकास
शाश्वत शिक्षण व सतत शिक्षण प्रणाली
पाठ्यपुस्तक सुरुवातीस २०० तासांचे प्रशिक्षण देऊन शिक्षण सुरू केले जाते, जे **एन.आई.ओ.एस.**च्या माध्यमातून आयोजित मूल्यांकन परीक्षेद्वारे सिद्ध केले जाते.

**राज्यनिहाय अंमलबजावणी उदाहरणे**
मध्यप्रदेशः १६ फेब्रुवारी २०२५ रोजी या कार्यक्रमात १७ लाखाहून अधिक नवसाक्षरांनी बुनियादी साक्षरता व संख्यामिती परीक्षेत सहभाग घेतला.
छत्तीसगढ (रायगढ): २३ मार्च २०२५ रोजी १८,७७० शिक्षार्थी २०० तासांचा अभ्यास पूर्ण करून परीक्षा दिली. १०००+ परीक्षा केंद्रांमध्ये परीक्षा आयोजित करण्यात आली.
सरगुजा (अम्बिकापुर): हजारो शिक्षार्थींनी चाचणी दिली; अनेक परीक्षार्थी 60 वर्षांनंतरही सहभागी



झाले; कारागृहात कैद झालेल्यांनाही सामाविष्ट करण्यात आले.
अजमेर, राजस्थानः किशनगढ ब्लॉकमध्ये ४६९ निरक्षरांनाही परीक्षा दिली; यात महिलांची संख्या पुरुषांपेक्षा खूप अधिक होती.

**प्रशिक्षण व समन्वय**
सरगुजा, छत्तीसगढः दोन दिवसीय प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित; मास्टर ट्रेनर्स तयार करण्यात आले.
धनबाद, झारखंडः प्राध्यापकांना ऑनलाइन सर्वेक्षण अप व प्रणालीबद्दल प्रशिक्षण देण्यात आले.
ऑनलाईन प्रशिक्षणः युट्यूबवर माध्यमातून अधिकारी, शिक्षक आणि पर्यवेक्षकांसाठी मोबाईल अप वापर बद्दल प्रशिक्षण आयोजित.

**जाहिरात आणि उत्सव**
तांदुळवाडी विद्यालय (जळगाव): राज्यस्तरीय मेळावा आयोजित- स्थानीक स्टॉल, सूत्रसंचालन, सभासद उपस्थित, प्रशिक्षण व जनजागृती.

**अहवाल आणि विद्यमान अडचणी**
प्रवेशिका पूर्ण झाल्यानंतर मूल्यांकन परीक्षेचे आयोजन नीट करून एन.आय.ओ.एस. प्रमाणपत्र जारी झाले तरी
डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर-मोबाइल एप, व्हॉट्सअॅप, यू-ट्यूब वापरून सामग्री पोहोचवली जात आहे.
मोनीटरिंग सुविधा जसे की जिओ-टॅगिंग, ऑनलाइन डेटा अपलोडिंग, नियंत्रण कक्ष/रूमची स्थापना इत्यादीही राबवली गेली आहेत.

**निष्कर्ष**
उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम हा केवळ एक जेवनकप साक्षरता मोहिम नसून, जीवन कौशल्ये, व्यावसायिक गुण, सतत शिक्षण यांचा संगम आहे. विविध राज्यांमध्ये परीक्षांचा उत्साह, महिलांचा मोठा सहभाग, आणि प्रशिक्षण कार्यक्रम यामुळे या मोहिमेची प्रासंगिकता आणि प्रभाव वाढतो आहे. DIGITAL माध्यमांचा उपयोग, प्रशिक्षकांचा संकल्प, ग्राम-नगर पातळीवरील अंमलबजावणी-हे सर्व मिळून हा कार्यक्रम एक साक्षरता क्रांतीचा रुपरेषा आहे